गुरु तेग बहादुर यांचे हौतात्म्य भारताच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेच्या रक्षणासाठी : मुख्यमंत्री फडणवीस
>> पान 2

उबाठा हा कीड लागलेला पक्ष : नितेश राणेंचा घणाघात
>> पान 3

अंधारात हरवले निरागस जीव: दोन जुळ्या चिमुकल्या जीवनाचे अमानुषिक अंत
>> पान 4

**सुविचार**

आपले ध्येय साध्य करण्यासाठी प्रयत्न करा.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 83 ■ रविवार, दि. 26 ऑक्टोबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



पुन्हा सरवाराम बाइंडर:अभिनेते सयाजी शिंदेंची छाप, दिग्दर्शक अभिजित झुंझारराव‍चे दोन अंकातले सादरीकरण अफलातून!

आतील पान

# बॉलीवूडचे विनोदी अभिनेते सतीश शाह यांचे निधन

## किडनीच्या आजाराशी झुंज ठरली अपयशी

**मुंबई/प्रतिनिधी** : मैं हूं ना, जाने भी दो यारो सारख्या चित्रपटांसह अनेक भूमिकांमधून प्रेक्षकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणारे ज्येष्ठ विनोदी अभिनेते सतीश शहा यांचं मुंबईतील हिंदुजा रुग्णालयात आज निधन झाले आहे . किडनीच्या आजारामुळे ते त्रस्त होते. ७४ व्या वर्षी या अभिनेत्याने अखेरचा श्र्वास घेतला. चार दशकांहून अधिक काळ प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या या अभिनेत्याच्या जाण्याने भारतीय चित्रपट सृष्टी आणि दूरदर्शन क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण पर्व संपल्याची भावना व्यक्त होत आहे.

(२५ ऑक्टोबर) दुपारी २.३० वाजताच्या सुमारास अभिनेत्याच्या निधनाच्या वृत्ताची पुष्टी झाली असून त्यांच्या पार्थिवावर उद्या (२६ ऑक्टोबर) अंत्यसंस्कार करण्यात येईल अशी माहिती आहे .

सतीश शाह यांनी आपल्या अफाट विनोदबुद्धी आणि अनोख्या अभिनयशैलीमुळे प्रेक्षकांच्या मनात कायमचे स्थान मिळवले. १९८३ मध्ये प्रदर्शित झालेल्या प्रसिद्ध व्यंगचित्रपट 'जाने भी दो यारो' मधील त्यांच्या अनेक भूमिकांनी त्यांना घराघरात लोकप्रिय केले. त्यांच्या फिल्मोग्राफीमध्ये 'हम साथ–साथ हैं', 'मैं हूं ना', 'कल हो ना हो', 'कभी हां कभी ना', 'दिलवाले दुल्हनिया ले जाएंगे' आणि 'ओम शांती ओम' सारख्या अनेक हिट चित्रपटांचा समावेश आहे. प्रत्येक भूमिकेतून त्यांनी वेगवेगळ्या प्रकारचा अभिनय सादर करत आपल्या बहुगुणी व्यक्तिमत्त्वाची झलक दाखवली.

दूरदर्शनवरही सतीश शाह यांनी प्रचंड लोकप्रियता मिळवली. 'साराभाई वर्सेस साराभाई' मालिकेत त्यांनी साकारलेली इंद्रवदन साराभाई ही व्यक्तिरेखा आजही भारतीय टेलिव्हिजन इतिहासातील सर्वाधिक संस्मरणीय कॉमिक रोल्सपैकी एक मानली जाते. याआधी त्यांनी १९८४ मधील प्रसिद्ध सिटकॉम 'ये जो है जिंदगी' मधून प्रेक्षकांच्या घरात पोहोचत लोकांची मने जिंकली होती. सतीश शाह यांच्या जाण्याने केवळ एक प्रतिभावान कलाकार गमावला गेलेला नाही, तर भारतीय मनोरंजन विश्र्वाने आपल्या विनोद आणि संवेदनशीलतेचा एक अनमोल खजिना हरवला आहे. त्यांच्या कलाकृती



आणि व्यक्तिरेखा प्रेक्षकांच्या मनात सदैव जिवंत राहतील.

## ऑक्टोबरमध्ये मुंबईतील हवा प्रदूषकाच्या पातळीत सर्वाधिक वाढ

**मुंबई/प्रतिनिधी** : ऑक्टोबर महिन्यात मुंबईच्या हवेतील पीएम २.५ आणि पीएम १० या प्रदूषकांच्या दैनंदिन सरासरी पातळीत सर्वाधिक वाढ झाली आहे. जानेवारी ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीत यात सर्वाधिक वाढ ऑक्टोबर महिन्यात झाली आहे. ऑक्टोबर महिन्यात मुंबईतील १९ ठिकाणांवरील हवा प्रदूषण मापकांवर पीएम २.५ ची सर्वाधिक नोंद झाली. तर, ७ ठिकाणांवरील हवा प्रदूषण मापकांवर पीएम १० ची सर्वाधिक नोंद झाली आहे. ही वाढ १८ ते २२ ऑक्टोबर या कालावधीत म्हणजेच दिवाळीत झालेली आहे. पीएम २.५ जाडीचे आणि त्यापेक्षाही सूक्ष्म धूलिकण जास्त धोकादायक समजले जातात. हवेत पीएम २.५ चे प्रमाण जास्त असते तेव्हा धुरक्याचे प्रमाण वाढते. मुंबईत १८ ते २२ ऑक्टोबर या कालावधीत म्हणजेच दिवाळीत पीएम २.५ ची सर्वाधिक नोंद झाली. 'सेंटर फॉर रिसर्च ऑन एनर्जी ॲण्ड क्लिन एअर' या संस्थेने केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नोंदीचे विषण केले. या नोंदी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (एमपीसीबी), इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेट्रोलॉजी (आयआयटीएम) आणि मुंबई महापालिकेने स्थापित केलेल्या प्रदूषण मापकांद्वारे केल्या जातात. त्यातून हा निष्कर्ष काढण्यात आला आहे. दरम्यान, पीएम २.५ बरोबरच पीएम १० ची देखील सर्वाधिक नोंद झाल्याचे निदर्शनास आले आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने (सीपीसीबी) पीएम१० ची (१० मायक्रॉन व्यासाच्या कणांसाठी) २४ तासांच्या सरासरीसाठी १०० मायक्रोग्रॅम प्रति घन मीटर इतकी मर्यादा निर्धारित केली आहे.

## राज्यात २७ ऑक्टोबरपासून 'दक्षता जनजागृती सप्ताह' निमित्त विविध कार्यक्रम

**मुंबई/प्रतिनिधी** : भ्रष्टाचार निमुलनासाठी जागरूकता निर्माण करण्याच्या हेतूने दरवर्षी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या ३१ ऑक्टोबर या जन्मदिनापासून 'दक्षता जनजागृती सप्ताह' साजरा केला जातो. यावर्षी २७ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यावर्षीच्या सप्ताहाची संकल्पना 'दक्षता आपली सामायिक जबाबदारी' अशी ठेवण्यात आली असून राज्य शासनाच्या सर्व विभागांमध्ये या अनुषंगाने विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

सप्ताहाची सुरुवात २७ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता भ्रष्टाचार निर्मुलनाच्या प्रतिज्ञेने होणार असून सर्व शासकीय कार्यालयांमध्ये ही प्रतिज्ञा घेण्यात येईल. त्यानंतर राज्यपाल आणि मुख्यमंत्री यांनी दिलेले संदेश वाचून दाखवले जातील. तसेच हे संदेश राज्यातील जनतेपर्यंत विविध माध्यमांद्वारे पोहोचविण्यात येतील.

सप्ताहादरम्यान कार्यालयांच्या दर्शनी भागात तसेच सार्वजनिक ठिकाणी भ्रष्टाचाराविरोधी जनजागृतीचे बॅनर, पोस्टर आणि संदेश प्रदर्शित करण्यात येतील.

# मुंबई पालिकेसाठी भाजपनं कंबर कसली!

## १५० जागा लढवण्याचं लक्ष्य, शिंदेच्या शिवसेनेला किती जागा?

**मुंबई/प्रतिनिधी : मुंबई महापालिकेसाठी भाजपनं अधिकाधिक जागा जिंकण्याच्या दृष्टीने तयारी सुरु केली असली तरी भाजपकडून १५० जागांचे लक्ष्य यंदाच्या महापालिकेत ठेवण्यात आले आहे. यंदा, महायुतीत भाजप मुंबई महापालिका लढणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिवाळीच्या अनौपचारिक गप्पा दरम्यान स्पष्ट केलं आहे. मात्र, अधिकाधिक जागा आपल्या पारड्यात पाडण्यासाठी भाजपने प्रयत्न सुरु केले आहेत. सोबतच, उपमेदवारांची चाचपणी देखील सुरु केली आहे.**

एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला ६५ ते ७५ दरम्यान जागा दिल्या जाऊ शकतात अशी भाजपच्या गोटातून सांगण्यात येत आहे. दरम्यान, भाजप नेते जाहीररित्या बोलत नसले तरी कार्यकर्त्यांना भाजपने अधिक जागा लढवाव्यात असं वाटत असल्याचं नेत्यांकडून सांगितले जात आहे. केंद्र आणि राज्यापाठोपाठ मुंबई महापालिकेत वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी भाजपकडून आखणी सुरु झाली आहे. दरम्यान, १५० जागा लढण्याचे टार्गेट डोळ्यासमोर असलेल्या भाजपची नेमकी रणनीती काय आहे याबाबतची माहिती पाहुयात.

शिंदेंच्या शिवसेनेला भाजपकडून ६५ ते ७५ जागा सोडल्या जाणार, आहेत. सोबतच उमेदवार निवडीची जबाबदारी घेतली जाणार आहे. दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आल्यास सेनेला फटका बसण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. अशात भाजपचे अधिकाधिक उमेदवार उपनगरात उतरवले जाणार आहेत. सोबतच, भाजप आमदार असलेल्या मुंबईतील मतदारसंघात देखील संपूर्ण जोर भाजपकडून लावला जाणार आहे. ज्यामध्ये कुलाबा, मलबार हिल, सायन, वडाळा या मतदारसंघाचा समावेश असणार आहे. ठाकरेंच्या बालेकिल्ल्यात जिंकून येणे हेच निकष डोळ्यासमोर ठेवत जागावाटप होणार आहे. ज्या जागांवर अधिक पेच त्यासंदर्भात महायुतीचे नेते एकत्रित येत पेच सोडवण्याचा प्रयत्न असणार आहे. उमेदवारांची अदलाबदली महायुतीत विधानसभेत दिसली होती, तशीच रणनीती काही जागांवर होण्याची शक्यता आहे. महाविकास आघाडी आणि विशेषतः ठाकरेंचे माजी नगरसेवक फोडण्याचा देखील प्रयत्न महायुतीकडून होऊ शकतो. दोन्ही भावांना मुंबईत फायदा होऊ नये यासाठी मायक्रो प्लॅनिंग केले जाणार आहे. दरम्यान, भाजपच्या जागा वाटपाच्या चर्चेवर ठाकरे गटाकडून जोरदार टीका करण्यात आली आहे. खासदार संजय राऊत यांनी जागावाटपावरुन महायुतीची खिल्ली उडवली आहे.



तर अंबादास दानवेंनी एकनाथ शिंदेंना भाजपचं ऐकावं लागणार अशी बोचरी टीका केली आहे.

एकीकडे भाजपनं १५० जागांवर तयारी सुरु केली असली तरी शिंदेंच्या शिवसेनेकडून १०० हून अधिक जागा लढण्याचा निर्धार केला आहे. सोबतच, शिंदेंकडून नुकताच दिल्ली दौरा करण्यात आला आहे. ज्यात समसमान वाटप मुंबई महापालिकेसाठी व्हावं अशी मागणी शिवसेनेच्या गोटातून होताना दिसत आहे. अशातच दिवाळीचे फटाके जरी फुटले असले तरी आता राजकीय फटाके फुटायला सुरुवात होणार आहे. अशात, जागावाटपा आधीच महायुतीच्या नेत्यांमध्ये मतभेदाचे फटाके फुटताना दिसू शकतात. अशात, हा पेच महायुती कशी सोडवणार हे बघणं महत्त्वाचं असणार आहे.

# महायुतीत समसमान जागा वाटप व्हावं

## मुंबईत समसमान जागांसाठी शिवसेना आग्रही



**नवी दिल्ली :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वातील शिवसेना मुंबई महापालिका निवडणुकीत ५०–५०च्या फॉर्म्युल्यासाठी आग्रही असल्याची माहिती आहे. मुंबई महापालिका निवडणुकीत समसमान जागा वाटप व्हावं अशी भूमिका एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची आहे. एकनाथ शिंदे दिल्ली दौऱ्यावर असतानाच ही माहिती शिवसेनेतील विश्र्वसनीय सूत्रांकडून देण्यात आली आहे. मुंबई महापालिकेची सदस्यसंख्या २२७ इतकी आहे. आता मुंबई महापालिकेत महायुती कशा प्रकारे जागा वाटप करणार याकडे लक्ष लागलं आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून मुंबई महापालिका निवडणुकीत समसमान जागा वाटपासाठी आग्रह धरला जात आहे. महायुतीत समसमान जागा वाटप व्हावं यासाठी शिवसेना आग्रही असल्याची माहिती आहे. ही माहिती शिवसेनेतील विश्र्वसनीय सूत्रांकडून देण्यात आली आहे. एकनाथ शिंदे दिल्ली दौऱ्यावर असताना मोठी बातमी समोर आली आहे.

एकीकडे एकनाथ शिंदेंची शिवसेना मुंबई महापालिकेत समसमान जागा वाटपासाठी आग्रही असताना भाजप मात्र मुंबई महापालिका निवडणुकीत १५० जागा लढवण्याची शक्यता आहे. तर, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला ६५–७५ जागा दिल्या जाऊ शकतात अशा चर्चा सुरु आहेत. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला आणि रामदास आठवले यांच्या आरपीआय आठवले गटाला काही जागा दिल्या जाऊ शकतात अशा चर्चा सुरु आहेत



# न भूतो न भविष्यती मोर्चा झाला पाहिजे, दिल्लीनेही दखल घेतली पाहिजे अशी तयारी करा

## राज ठाकरेंचा मनसैनिकांना आदेश

मुंबई : राज्यातील विरोधकांनी निवडणूक आयोगाच्या विरोधात आता एल्गार पुकारला आहे. विरोधकांनी रस्त्यावर उतरून आपला आवाज उठवण्याचा निर्धार केला आहे. १ नोव्हेंबरला विरोधक मुंबईत निवडणूक आयोगाच्या विरोधात विराट मोर्चा काढणार आहेत. या मोर्चात महाविकास आघाडीसोबतच महाराष्ट्र नवनिर्माण सेना देखील सहभागी होणार आहे. या पार्श्र्वभूमीवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पक्षाच्या सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांची 'शिवतीर्थ' निवासस्थानी तातडीची बैठक बोलावली होती. या बैठकीत राज ठाकरे यांनी आगामी मोर्चा यशस्वीपणे पार पडण्यासाठी मनसेच्या नेत्यांना मार्गदर्शन दिले. बैठकीला बाळा नांदगावकर, अविनाश अभ्यंकर, अभिजीत पानसे, अविनाश जाधव, गजानन काळे, यशवंत किल्लेदार यांच्यासह मनसेचे प्रमुख नेते उपस्थित होते.

बैठकीत काय म्हणाले राज ठाकरे?

राज ठाकरे यांनी बैठकीत सांगितले की, हा मोर्चा सत्तेसाठी नाही, तर सत्यासाठी आहे, आणि हा मोर्चा खोट्या मतदारांसाठी नाही, तर खऱ्या मतदारांसाठी आहे. त्यांनी नेत्यांना निर्देश दिले की, गल्ली ते दिल्ली मोर्चाची दखल घ्यायला भाग पाडा, असे त्यांनी म्हटले. याशिवाय, राज ठाकरे यांनी बैठकीत आदेश दिला की, मोर्चाचे आयोजन न भूतो न भविष्यती असा ठोस व प्रभावी प्रकारे करावे. राज ठाकरे यांच्या सूचनांनंतर मनसेचे नेते आणि पदाधिकारी मोर्चाच्या यशस्वी आयोजनासाठी जोमाने तयारी लागले आहेत.

दरम्यान, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज मुंबई महानगर पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात राज्यात सध्या होणाऱ्या निवडणुकांसाठी ९६ लाख खोटे मतदार महाराष्ट्राच्या यादीत भरले असल्याचा गंभीर आरोप केला होता. राज ठाकरे यांनी मुंबईमध्ये ८ ते १० लाख, ठाण्यामध्ये ८ ते ८.५ लाख, तसेच पुणे आणि नाशिकमध्येही अशाच प्रकारे खोटे मतदार भरले गेल्याचा आरोप केला. निवडणूक आयोगाने जोपर्यंत मतदार यादी पूर्णपणे स्वच्छ होत नाही आणि सर्व राजकीय पक्षांचे समाधान होत नाही, तोपर्यंत महाराष्ट्रामध्ये निवडणुका घेऊ नयेत, अशी मागणी देखील केली होती. केंद्रात, राज्यात, महानगरपालिकेत, जिल्हा परिषदेत 'आम्हीच पाहिजे' यासाठी हे सर्व सुरू असल्याचा हल्लाबोल त्यांनी भाजपवर केला होता.

# बुलढाण्यात महायुतीसोबतच लढणार : प्रतापराव जाधव

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी** :आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात महायुतीची तयारी वेगाने सुरू आहे. केंद्रीय आयुष्य, आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी सांगितले की, ''आगामी निवडणुकीत बुलढाणा जिल्ह्यातील सर्व ठिकाणी महायुतीसोबत लढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. महायुतीसोबत राहूनच आम्ही विजयी होऊ,'' असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

फलटन प्रकरणावर प्रतिक्रिया:

फलटन प्रकरणावर बोलताना जाधव म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून, संबंधित दोन कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच त्यांच्या विरोधात कठोर कारवाईचे आदेश देण्यात आले असल्याची माहिती त्यांनी दिली.

संजय राऊत यांच्यावर टीका:

संजय राऊत यांच्यावर टीका करताना प्रतापराव जाधव म्हणाले, ''संजय राऊत राहुल गांधी यांच्या सारख्यांचे पाय चाटतात, पाय धुतात. त्यापेक्षा अमित शाह आणि नरेंद्र मोदी हे ज्येष्ठ आणि श्रेष्ठ नेते आहेत,'' अशी तीव्र प्रतिक्रिया त्यांनी दिली.

बच्चू कडू यांच्या विधानावर प्रतिक्रिया:

बच्चू कडू यांच्या वक्तव्यावर बोलताना जाधव म्हणाले, ''बच्चू कडू यांचे बोलणे, भाषा आणि कार्यपद्धती सर्वांना माहीत आहे. त्यांच्या वक्तव्याचे समर्थन कोणी करत नाही,'' असे त्यांनी सांगितले. केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या या वक्तव्यामुळे आगामी नगरपरिषद आणि जिल्हा परिषद निवडणुकीतील राजकीय वातावरण अधिक तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. महायुतीची रणनीती आणि विरोधकांवरील टीका, यामुळे बुलढाण्यातील राजकीय समीकरणांना नवा रंग मिळू शकतो



>> पान २

## शहरे गुदमरली; श्वास कोंडला

सर्वोच्च न्यायालयाने आदेश देऊनही दिवाळीच्या दिवसात रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या फटाकेबाजीमुळे देशातील प्रमुख शहरात रात्रीच्या वेळेत हवा प्रदूषणात प्रचंड वाढ झाल्याचे समोर आले आहे. मंगळावर ते बुधवार या तिन्ही दिवशी देशातील प्रमुख शहरांच्या हवेचा निर्देशांक वाईट स्तरावर होता त्यामुळे आधीच प्रदूषित असलेल्या शहरांची हवा आणखी प्रदूषित झाली. वास्तविक फटाकेमुक्त, पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करा असे आव्हान अनेक सामाजिक आणि सेवाभावी संस्थांनी केले होते. शालेय शिक्षण विभागाने तर शालेय विद्यार्थ्यांना फटाके उडवणार नाही अशी शपथ दिली. न्यायालयाने फटाके उडवण्यास परवानगी दिली मात्र वेळेचे बंधन घातले या सगळ्या आव्हानांकडे नागरिकांनी दुर्लक्ष करून मनसोक्त फटाकेबाजी केली वास्तविक फटाक्यांचे दुष्परिणाम सर्वांना माहीत आहे तरीही दरवर्षीप्रमाणे यावर्षीही सरकारच्या आणि सेवाभावी संस्थांच्या आव्हानाला हरताळ फासत सर्वत्र फटाक्यांचा बेसुमार धूर काढण्यात आला त्याच्या व्हायचा तो परिणाम झालाच. फटाक्यांमुळे अनेक शहरांची हवा प्रदूषित झाली विशेषतः मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे यासारख्या मोठ्या शहरातील हवेचे प्रदूषण चिंता वाटावी इतक्या गंभीर पातळीवर जाऊ लागले. जी शहरे कमी प्रदूषित श्रेणीत गणली जात होती त्या शहरातही हवेचे प्रदूषण कमालीचे वाढल्याचे समोर आले आहे. मुंबई पुण्याच्या तुलनेत ग्रामीण भागात कमी प्रदूषण असते मात्र यावेळी ग्रामीण भागातही प्रदूषण कमालीचे वाढले. ग्रामीण भागात पहिल्यांदाच इतके प्रदूषण वाढल्याचे पाहायला मिळाले. या प्रदूषणाला फटाकेच जबाबदार आहेत. दिवाळीत बेसुमार फटाकेबाजी करण्यात आली त्यामुळे चांगली हवा असलेली शहरे अशी ओळख असलेल्या शहरांचीही प्रदूषित शहरांत गणना होऊ लागली. अर्थात मुंबई, नवी मुंबई, ठाणे हीच शहरे नाही तर पुणे, नागपूर, छत्रपती संभाजी नगर यासारख्या शहरातही फटाक्यांच्या आतषबाजीने प्रदूषण वाढले. केवळ राज्यातीलच नाही तर देशातीलही अनेक शहरात फटाक्यांमुळे प्रदूषण वाढले. विशेष म्हणजे देशातीलच नव्हे तर जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दिल्ली शहरातील हवा मात्र समाधानकारक या श्रेणीत गणली गेली आहे. दिल्लीतील हवा अतिप्रदूषित या श्रेणीतून समाधानकारक श्रेणीत गणली गेली याचे कारण म्हणजे यावर्षी दिल्लीत फटाके वाजवण्यास बंदी घालण्यात आली होती आणि या बंदीचे कसोशीने पालन करण्यात आले होते या उलट आपल्या राज्यात मात्र उत्सवाच्या नावाखाली लोकांनी मनमानी करत बेसुमार फटाक्यांची आतषबाजी केली त्यामुळेच दरवर्षीपेक्षा यावर्षी अधिक प्रमाणात फटाके उडवण्यात आले त्याचाच परिणाम म्हणजे राज्यातील अनेक शहरे अतिप्रदुषित किंवा प्रदूषित श्रेणीत गणली गेली. अर्थात हवा प्रदूषित होण्यास केवळ फटाके हेच एकमेव कारण आहे असे नाही तर वाढती वाहने हे ही एक महत्वाचे कारण यामागे आहे मात्र दिवाळीत प्रदूषणाची पातळी खूप वाढते हे सत्य कोणीही नाकारू शकणार नाही आता हेच पहा ना सोमवारी संध्याकाळी पुण्याच्या हवेची पातळी समाधानकारक या श्रेणीत होती ती अवघ्या चोवीस तासात वाईट या श्रेणीत पोहचली याचाच अर्थ बेसुमार फटाकेबाजीने हवा प्रदूषित झाली. हवा प्रदूषित झाल्याने शहरांचा जीव गुदमरला आणि नागरिकांचा श्वास कोंडला. दिवाळी नंतर अस्थमाच्या रुग्णांत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे पाहायला मिळाले. या दूषित हवेचा सर्वाधिक फटका लहान मुले, वृद्ध नागरिक व व्याधीग्रस्त रुग्णांना बसला शिवाय फटाक्यांमुळे अनेक ठिकाणी दुर्घटना घडल्याच्या बातम्याही आपण टीव्हीवर पाहिल्या. अनेक मुले फटाक्यांमुळे जखमी झाले तर काही ठिकाणी फटाक्यांमुळे आग लागून दुर्घटना घडल्या त्यात मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली. हे सर्व टाळायचे असेल तर किमान पुढील वर्षांपासून तरी फटाकेमुक्त दिवाळी साजरी करायला हवी. सरकारनेही फटाक्यांवर बंदी आणायला हवी आणि हो ही बंदी केवळ दिवाळी पुरतीच नको तर कायमस्वरूपी हवी कारण दिवाळी व्यतिरिक्त इतरवेळीही फटाके वाजवले जातात दिवाळीत त्याचे प्रमाण अधिक असते इतकेच कदाचीत त्यामुळेच दिवाळीत फटाक्यांचे दुष्परिणाम तीव्रतेने दिसून येतात.

# गुरु तेग बहादुर यांचे हौतात्म्य भारताच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परपरेच्या रक्षणासाठी : मुख्यमंत्री फडणवीस

### हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर यांच्या ३५०व्या शहिदी समागमानिमित्त राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन

**दैनिक आपला विदर्भ**





**मुंबई/प्रतिनिधी** : शीख पंथाचे ९ वे गुरु तेग बहादुर यांचे हौतात्म्य हे केवळ शीख पंथीयांसाठी नव्हे, तर संपूर्ण भारताच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेच्या रक्षणासाठी महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. गुरु तेग बहादुर यांच्या हौतात्म्याचा इतिहास सर्वदूर पोहोचविण्यासाठी शासन सर्वतोपरी सहकार्य करेल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

'हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर' यांच्या ३५०व्या शहिदी समागमानिमित्त दादर येथील योगी सभागृहात राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

कार्यक्रमास आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, आमदार बाबू सिंह महाराज, अल्पसंख्याक विभागाचे सचिव रूचेश जयवंशी, संत ज्ञानी हरनाम सिंघजी (खालसा भिंदरनवाले मुखी दमदमी टकसाल, प्रधान सत समाज), राज्यस्तरीय समितीचे रामेश्वर नाईक, सरताज सतींदर, महंत सुनील महाराज, स्वामी हिरानंद, प्रसिद्ध गायक सतेंदर सरताज आदींसह विविध सहा समाजाचे संत, गुरू आणि समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, गुरु तेग बहादुर यांनी भारतातील सर्व धर्मीयांच्या रक्षणासाठी बलिदान दिले आहे. म्हणूनच त्यांना 'खालसा दी चादर' नव्हे तर 'हिंद दी चादर' म्हटले गेले. त्यांनी धर्मांतरास विरोध करत भारताच्या संस्कृती आणि श्रद्धेचे रक्षण केले. त्यांच्या बलिदानाचा इतिहास राज्यातील प्रत्येक घरात पोहोचविणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. नांदेड, नागपूरसह मुंबईत शहिदी समागमनिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. तसेच, तहसील, शहर, जिल्हा व क्षेत्रीय समितीच्या माध्यमातून प्रत्येक गावात आणि घराघरात गुरू तेग बहादुरांच्या हौतात्म्याचा इतिहास पोहोचविला जाणार आहे.

मुख्यमंत्री म्हणाले की, गुरूबाणी ही जगातील एक अशी अनोखी रचना आहे ज्यात केवळ शीख गुरूंचेच नव्हे तर संत नामदेवांचे आणि विविध पंथांचे चांगले विचार समाविष्ट आहेत. सर्व चांगल्या विचारांना सोबत घेऊन जीवनाचा मार्ग दाखवणारी ही गुरूबाणी आपल्याला जोडण्याचे काम करते. या कार्यक्रमानिमित्त शीख, सिकलिगर, बंजारा, लबाना, मोहियाल, सिंधी हे सहा समाज एकत्र आले आहेत. हा कार्यक्रम जनमाणसांपर्यंत पोहोचविण्यासाठी समिती आणि शासन एकत्रितरित्या काम करेल.

यावेळी 'हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर साहेब' यांच्या ३५०व्या शहिदी समागमनिमित्त संकेतस्थळाचे आणि गुरु तेग बहादूर यांच्या बलिदानाचा इतिहास सांगणाऱ्या गीताचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

## पुन्हा सखाराम बाइंडर:अभिनेते सयाजी शिंदेची छाप, दिग्दर्शक अभिजित झुंझाररावचे दोन अंकातले सादरीकरण अफलातून!

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्रातील भव्य आणि विस्तृत म्हणता येईल अशा अंबरनाथ येथील धर्मवीर आनंद दिघे नाट्यमंदिर लोकार्पणानिमित्त खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आयोजित आठ नाटकांच्या महोत्सवात दिनांक २२ ऑक्टोबर रोजी विजय तेंडुलकरांचे सखाराम बाइंडर सादर झाले. यावेळी ६५० आसनक्षमतेच्या नाट्यगृहात जवळपास १००० प्रेक्षक खाली बसून उभे राहून नाटकाचा अनुभव घेत होते. विजय तेंडुलकर हे मराठी नाटकातील अजरामर नाव. आपल्या सर्व नाट्यकृतीतून त्यांनी माणसातील विकृती, लालसा, वासना, कृतकता, कृतघ्नपणा यावर प्रकाश टाकला. सखाराम बाइंडर हे मूळ नाटक तीन अंकी आहे. ते दोन अंकी करणे म्हणजे, म्हणजे सह्याद्री एका फोटोत बसवणे. पण हे अवघड काम दिग्दर्शक अभिजित झुंझाररावने चोख बजावले आहे. या नाटकातील अनेक फ्रेम्स लक्षात राहतील अशा बसवल्या आहेत.

लक्ष्मी, चंपा आणि सखाराम यांच्या लकबी आणि देहभाषा अभिजितने बारकाईने ठरवल्यामुळे ही तिन्ही पात्रे उठून दिसतात. त्यात तेंडुलकर यांचे लेखनाचे श्रेय असले, तरी दिग्दर्शक झुंझारराव यांनीही वर दिलेली फोडणी नाकारता येत नाही. सयाजी शिंदे, नेहा जोशी, अनुष्का बोराडे, चरण जाधव आणि स्वत:कडून चांगल्या जागा निर्माण करण्यास दिग्दर्शक मागे राहिला नाही. सयाजी आणि चरण हे दोघे तालवाद्य छान वाजवतात. त्याचाही त्याने चपखल वापर केला आहे. या सगळ्याला परिपूर्ण साथ लाभली आहे ती प्रकाश योजनाकाराची. लक्ष्मी आस्तिक तर चंपा नास्तिक. लक्ष्मी सोज्वळ तर चंपा उठवळ. लक्ष्मी नागरी तर चंपा ग्रामीण. लक्ष्मी दिवसाची स्त्री आणि चंपा ही रात्रींची स्त्री, हे सारे फरक लेखकाने आणि पात्रांनी गडद केले आहेत. तसेच प्रकाशयोजनाकार आणि संगीतकार आशुतोष वाघमारे या दोघांनीही केले आहेत. लक्ष्मीचा वावर प्रकाश दिवसा आणि चंपाचा वावर रात्र हा फरक प्रकाशयोजनाकाराने दाखवला आहे.

## महाराष्ट्र शासनाचे २५ व ३0 वर्षे मुदतीचे १,000 कोटी रुपयांचे तर, ११ व १७ वर्षे मुदतीचे १,५00 कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** :महाराष्ट्र शासनाच्या २५ वर्षे मुदतीच्या १,००० कोटींच्या रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाच्या सचिव शैला ए. यांनी पत्रकान्वये दिली आहे.

अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र एका गुंतवणुकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीत जास्त १ टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंत वाटप करण्यात येईल. २८ ऑक्टोबर, २०२५ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल. तर लिलावाचे बीडस् २८ ऑक्टोबर, २०२५ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत. यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.०० पर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान २९ ऑक्टोबर, २०२५ रोजी रोखीने, बँकर्स धनादेशप्रदान आदेश, डिमांड ड्राफ्ट किंवा त्यांच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात देय असलेले धनादेश बँकेची कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी अधिदानाने प्रदान करण्यात येतील. कर्जरोख्याचा कालावधी २५ वर्षांचा असून, रोख्यांचा कालावधी २३ ऑक्टोबर, २०२५ पासून सुरू होईल, तर कर्जरोख्याची परतफेड दिनांक २३ ऑक्टोबर, २०५० रोजी पूर्ण किमतीने केली जाईल. व्याजाचा दर ७.२९ टक्के दरसाल दरशेकडा एवढा असेल. व्याजाचे प्रदान रोख्याच्या मूळ दिनांकापासून मूळ किमतीवर प्रतिवर्षी २३ एप्रिल आणि दिनांक २३ ऑक्टोबर रोजी सहामाही पद्धतीने करण्यात येईल.

शासकीय रोख्यांमधील बँकांची गुंतवणूक ही बँकिंग विनियम अधिनियम, १९४९ खालील कलम २४ अंतर्गत सांविधिक रोकड सुलभता गुणोत्तर एसएलआर या प्रयोजनार्थ पात्र समजण्यात येईल.

# राज्यपाल हरिभाऊ बागडे यांची जन्मेजय निवासस्थानी सदिच्छा भेट

### आमदार अभिमन्यू पवार यांच्या निवासस्थानी अनौपचारिक संवादातून उजळले राजकीय आयुष्याचे क्षण

**औसा/प्रतिनिधी** : दीपावलीच्या शुभप्रसंगी राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी आमदार अभिमन्यू पवार यांच्या जन्मेजय निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. या प्रसंगी पवार कुटुंबीय, ज्येष्ठ स्वयंसेवक व विचार परिवारातील सहकारी कार्यकर्त्यांनी त्यांचे मन:पूर्वक स्वागत केले.हरिभाऊ बागडे यांनी आपल्या समृद्ध राजकीय व सामाजिक अनुभवातून मार्गदर्शन केले. या वेळी महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा) चे उपाध्यक्ष आ. राणाजगजितसिंहजी पाटील उपस्थित होते.




या चर्चेदरम्यान हरिभाऊ बागडे यांनी आपल्या दीर्घ राजकीय प्रवासाचा आढावा घेत विविध अनुभवांची उजळणी केली. मंत्री म्हणून काम करताना अनेक सकारात्मक आणि लोकहिताच्या निर्णयांची अंमलबजावणी घडवून आणल्याचा उल्लेख त्यांनी केला. आपल्या कारकिर्दीतील संस्मरणीय क्षण सांगताना त्यांनी एक खास प्रसंग आठवला एका दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी थेट फोन करून राजस्थान राज्यपालपदाची जबाबदारी स्वीकारण्याची विनंती केली, तो क्षण माझ्यासाठी अत्यंत अभिमानास्पद आणि अविस्मरणीय होता, असे बागडे भावनिकपणे म्हणाले.त्यांनी पुढे सांगितले की, २०१४ साली पक्ष नेतृत्वाने माझ्यावर विश्वास दाखवत मला महाराष्ट्र विधानसभेच्या अध्यक्षपदी नियुक्त केले. यापूर्वी राज्याच्या कॅबिनेट मंत्रिपदाची जबाबदारी सांभाळताना जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी अनेक ठोस पावले उचलली असल्याचाही त्यांनी उल्लेख केला.

या प्रसंगी आमदार अभिमन्यू पवार यांनी राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचे हार्दिक स्वागत करत त्यांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या. पवार म्हणाले, राज्यपाल बागडे यांचे नेतृत्व आणि अनुभव हे नव्या पिढीच्या राजकारण्यांसाठी प्रेरणादायी आहेत.कार्यकर्त्यांनीही या स्नेहमेळाव्याचा आनंद घेत राज्यपालांशी संवाद साधला. दिवाळीच्या या मंगलमय वातावरणात झालेला हा अनौपचारिक संवाद कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी ठरला.यावेळी प्रभुअप्पा राचटे, सुरेश कारंजे, सुशीलदादा बाजपेई, कंटप्पा मुळे, ह.भ.प. दत्तात्रय पवार गुरुजी, डॉ. अमोल जगताप, संदीपन जाधव, व्यंकटनाना मोरे, चंद्रशेखर सोनवणे, प्रा. भीमाशंकर राचटे, संतोष मुक्ता, सुभाष जाधव, किरण उटगे, काकासाहेब मोरे, सुनील उटगे,संगमेश्वर ठेसे, ॲड. परीक्षित पवार, बसवराज धाराशिवे, धनराज परसणे, माधवसिंह परिहार, आप्पासाहेब कोपरे, रुपेश कारंजे, उन्मेष वागदरे आदींसह संघपरिवारातील सदस्य उपस्थित होते.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# उबाठा हा कीड लागलेला पक्ष : नितेश राणेंचा घणाघात

दैनिक आपला विदर्भ

**सिंधुदुर्ग/प्रतिनिधी** :सिंधुदुर्ग जिल्ह्यात भाजपमध्ये सुरू असलेल्या पक्षप्रवेशांच्या पार्श्वभूमीवर राज्याचे पालकमंत्री नितेश राणे यांनी आज उबाठा (शिवसेना (ठाकरे गट)) या पक्षावर जोरदार टीका केली. ''उबाठा हा कीड लागलेला पक्ष आहे. किड जशी झाडाला लागते आणि हळूहळू आतून पोखरून टाकते, तसाच उबाठा पक्षही आता आतून आवळला जात आहे,'' असा घणाघात राणेंनी केला.

**भाजपमध्ये पक्षप्रवेश का वाढत आहेत?**

भाजपमध्ये होत असलेल्या पक्षप्रवेशांबाबत बोलताना राणे म्हणाले, ''विकास निधी देण्याची क्षमता भारतीय जनता पक्षात आहे. आपल्या गावाचा विकास करायचा असेल, तर निधी कुठून आणायचा, हा प्रत्येक कार्यकर्त्याचा प्रश्न असतो. भाजपमध्ये आल्यावर विकासकामांसाठी निधी सहज उपलब्ध होतो, म्हणून अनेक कार्यकर्ते आणि नेते भाजपमध्ये प्रवेश करत आहेत. आगामी काळात असे अनेक पक्षप्रवेश होतील,'' असे त्यांनी स्पष्ट केले.

**भाजपचाच जिल्हा परिषद अध्यक्ष व्हावा कार्यकर्त्यांची भावना**

जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राणे म्हणाले, ''भारतीय जनता पक्षाच्या प्रत्येक कार्यकर्त्याला वाटतंय की, जिल्हा परिषदेवर आपलाच अध्यक्ष बसला पाहिजे. पक्षसंघटनेची ताकद आणि जनतेचा पाठिंबा पाहता, हे शक्य आहे,'' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**'स्वत:ची कीड दूर करा' संजय राऊतांवर टीका**

संजय राऊत यांच्या वक्तव्यावर प्रत्युत्तर देताना राणे म्हणाले, ''उबाठा पक्षाच्या नेत्यांनी आधी आपल्या पक्षात लागलेली कीड दूर करावी. नंतर दुसऱ्या पक्षाला किती सूज आली आहे यावर मलमपट्टी लावण्याची भूमिका घेऊ नये. स्वतः च्या घरातील गळकी भिंत सांभाळा, मग दुसऱ्यांच्या घरावर टीका करा,'' असा टोला त्यांनी लगावला.



राणेंचा इशारा आणखी मोठे पक्षप्रवेश लवकरच पक्षसंघटन मजबूत करण्यासाठी राणे यांनी संकेत दिले की, ''भविष्यात आणखी काही प्रभावी नेते भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्याचा सर्वांगीण विकास हेच आमचं ध्येय आहे,'' असे ते म्हणाले.

## संक्षिप्त...

### डिजिटल व्यवहारांसाठी डाक विभागाची विशेष मोहीम: प्रीमियम, पॉलिसी, दाव्यांची माहिती तत्काळ मिळणार , ग्राहकांनी केवायसी दस्तऐवजांसह माहिती सादर करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : भारतीय डाक विभागाच्या वतीने डाक जीवन विमा आणि ग्रामीण डाक जीवन विमा योजनेंतर्गत डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देण्यासाठी दोन महिन्यांची विशेष मोहीम बुलढाणा विभागात १६ ऑक्टोबरपासून सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत सर्व सक्रिय पॉलिसीधारकांचे मोबाईल क्रमांक आणि ई-मेल आयडी अद्ययावत करून व्यवहार प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि कार्यक्षम करण्याचा उद्देश ठेवण्यात आला आहे. पॉलिसीधारकांनी आपले अद्ययावत संपर्क तपशील दिल्यास त्यांना प्रीमियम भरपाई, पॉलिसी स्थिती, दावा प्रक्रिया यासंदर्भातील सर्व माहिती तत्काळ एसएमएस व ई-मेलद्वारे मिळणार आहे. ग्राहकांनी आपल्या जवळच्या मुख्य किंवा उप टपाल कार्यालयात भेट देऊन आवश्यक केवायसी दस्तऐवजांसह माहिती सादर करावी. ग्रामीण भागातील शाखा टपाल कार्यालयांमध्येही ही प्रक्रिया सुलभतेने पूर्ण होणार आहे. डिजिटलायझेशनच्या या उपक्रमामुळे डाक जीवन विमा सेवांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा अधिक वापर होऊन ग्राहक सेवा दर्जा उंचावेल, असा विश्वास व्यक्त करत सर्व नागरिकांनी या मोहिमेत उत्साहाने सहभागी व्हावे, असे आवाहन बुलढाणाचे डाक अधीक्षक गणेश आंभोरे यांनी केले आहे.

### वादळी वाऱ्यासह पावसामुळे सोलर प्लेटचे नुकसान



**लोणार/प्रतिनिधी** : लोणार तालुक्यातील पांगरा डोळे गावातील शेतकरी करण पंढरी डोळे यांच्या शेतातील सोलर पॅनल प्रणाली वादळी वाऱ्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसानग्रस्त झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, करण डोळे यांच्या पांगरा डोळे शिवारातील गट क्रमांक १८ मधील पाउनेतीन एकर शेतीमध्ये विहिरीवर मागील वर्षी सौर उर्जेवर चालणारी सिंचनासाठी सोलर पॅनल प्रणाली बसविण्यात आली होती. मात्र दिनांक २१ ऑक्टोबर रोजी अचानक आलेल्या जोरदार वाऱ्यासह मुसळधार पावसामुळे सोलर पॅनलवरील पाट्या हवेच्या जोरदार दाबाने तुटून खाली पडल्या. त्यामुळे पॅनलच्या अनेक प्लेट्स तुटून फुटल्या असून संपूर्ण प्रणालीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.या घटनेमुळे शेतकऱ्याला आर्थिक फटका बसला असून, त्याचे नुकसान लाखोंच्या घरात असल्याचे अंदाज व्यक्त केला जात आहे. शेतकरी करण डोळे यांनी प्रशासनाकडे तात्काळ पंचनामा करून नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे.स्थानिक शेतकरी व ग्रामस्थांनी प्रशासनाने या घटनेची दखल घेऊन तातडीने मदत द्यावी, अशी मागणी केली आहे. वादळी पावसामुळे या परिसरातील इतर काही शेतकऱ्यांच्या शेतांनाही किरकोळ नुकसान झाल्याचे समजते.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ज्येष्ठ अभिनेते सतीश शाह यांना श्रद्धांजली; चतुरस्त्र अभिनेता, कला क्षेत्रातील मार्गदर्शक दुवा

**मुंबई/प्रतिनिधी** : चतुरस्त्र अभिनेते म्हणून सतीश शाह यांनी सिने, नाट्यसृष्टीत आपला वेगळा असा अमिट ठसा उमटविला आहे. सहज-सुंदर अभिनयातून साकारलेल्या भूमिकांच्या रुपांमध्ये ते रसिकांच्या मनांत चिरंतन राहतील, अशा शब्दात



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ अभिनेते सतीश शाह यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.सतीश शाह यांनी चित्रपटसृष्टी, रंगभूमी आणि दूरचित्रवाणी या तीनही माध्यमांत काम करताना रसिकांची दाद मिळवली. विनोदी, सहज-सुंदर, निखळ मनोरंजनात्मक भूमिका ते चरित्र अभिनेता अशी त्यांची वाटचाल राहिली. निखळ आणि भूमिकांना न्याय देणारा प्रामाणिक अभिनेता म्हणून त्यांची ओळख होती. मराठी चित्रपट सृष्टीच्या गौरवात भर घालणाऱ्या स्व. दादा कोंडके यांच्या चित्रपटात त्यांनी भूमिका वठवून मराठी रसिकांचीही दाद मिळवली. शाह यांच्या निधनामुळे कला क्षेत्राची हानी झाली आहे. या क्षेत्रातील पिढ्यांना जोडणारा एक मार्गदर्शक दुवा निखळला आहे. शाह यांच्या कुटुंबियांच्या आणि त्यांच्या चाहत्यांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत, या सर्वांना हा आघात सहन करण्याची ताकद मिळो, अशी प्रार्थना करून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ अभिनेते सतीश शाह यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

# अवैध सावकारांकडील ७४ हेक्टर शेतजमीन शेतकऱ्यांना परत

## – ५५ प्रकरणांत गुन्हे दाखल – ६५१ प्रकरणांची चौकशी पूर्ण

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियमातील कलमांनुसार जिल्ह्यातील ६९ प्रकरणातील अवैध सावकारांकडील ७४.२७ हेक्टर आर शेतजमिन शेतकऱ्यांना परत करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा उपनिबंधक डॉ. महेंद्र चव्हाण यांनी दिली आहे. बुलढाणा जिल्ह्यात अवैध सावकारांकडून होत असलेली पिळवणूक रोखण्यासाठी प्रशासनाकडून कडक कारवाई सुरू असून शेतकऱ्यांनी निर्भयपणे तक्रारी दाखल कराव्यात, असे आवाहनही त्यांनी केले आहे. दि. १९ ऑक्टोबर २०२५ रोजी 'दैनिक पुण्यनगरी'मध्ये ''सावकारी पाशात अडकलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनी हडपणाऱ्या टोळ्या सक्रिय, चिखलीत गल्लीबाजार तेजीत, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अवैध सावकारांना बळ'' या मथळ्याखाली बातमी प्रसिद्ध झाली होती. या बातमीचे खंडन करत जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने स्पष्ट केले की, अवैध सावकारी तक्रारींची दखल घेऊन आवश्यक ती कार्यवाही नियमितपणे करण्यात येते. शासन निर्णयानुसार, महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ च्या अंमलबजावणीसाठी जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. या समितीत जिल्हा पोलिस अधीक्षक सदस्य असून जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था हे सदस्य सचिव आहेत. हा अधिनियम अंमलात आल्यापासून आतापर्यंत कलम १६ अंतर्गत ७७८ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी ६५१ प्रकरणांची चौकशी पूर्ण करण्यात आली आहे. तसेच कलम १८(२) अंतर्गत ४०१ तक्रारी प्राप्त झालेल्या असून २७० तक्रारी निकाली काढल्या गेल्या आहेत, तर १३१ प्रकरणे प्रलंबित आहेत. या अधिनियमांतर्गत आतापर्यंत ६९ प्रकरणांत ७४.२७ हेक्टर शेतजमीन शेतकऱ्यांना परत करण्यात आली असून ५५ प्रकरणांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अवैध सावकारांकडून पिळवणूक झाल्यास जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलढाणा किंवा संबंधित तालुक्यातील सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था कार्यालयांकडे तक्रार दाखल करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

### मृतदेहाच्या हातावरील गोंदणाने घटनेला फोडली वाचा

**पुणे/प्रतिनिधी** : पत्नीचा विवाहबाह्य प्रेमसंबंध असल्याच्या संशयातून पतीनं तिची हत्या केल्याची घटना पुण्यात घडली आहे. पती आणि पत्नीमधील वाद टोकाला गेला. यावेळी पतीनं पत्नीच्या डोक्यावर वार केला. यात पत्नीचा मृत्यू झाला. खुनाचा पुरावा नष्ट करण्यासाठी पतीनं पत्नीचा मृतदेह फेकून दिला. परंतु मृतदेहाच्या हातावरील गोंदणानं घटनेला वाचा फोडली. यानंतर खुनाचा गुन्हा उघडकीस आला. तपासाची चक्रे फिरवत पोलिसांनी चोवीस तासाच्या आत आरोपी पतीला बेड्या ठोकल्या. या प्रकरणी पोलिसांनी पती सुदर्शन ऊर्फ रविराज रणजीत जाधव (३६, ता. बारामती) याला अटक केली आहे. याप्रकरणी त्याला न्यायालयानं ३१ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

# एसटी आगारात दर बुधवारी ''प्रवासी राजा दिन'' व ''कामगार पालक दिन'' साजरा होणार

## प्रवासी आणि कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी उपक्रम

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने दि. १५ जुलै २०२४ रोजी पासून प्रवाशांच्या समस्या, तक्रारी व सूचनांचे स्थानिक पातळीवर जलद गतीने निराकरण होण्याच्या उद्देशाने प्रत्येक आगारात दर प्रत्येक बुधवारी '' प्रवासी राजा दिन'' व '' कामगार पालक दिन'' आयोजित करण्यात येणार आहे. यापूर्वी हा दिन महिन्याच्या दर सोमवारी व शुक्रवारी आयोजित होत होता आता त्यात बदल करण्यात आला आहे. या उपक्रमात विभाग नियंत्रक आगारात जाऊन प्रवाशांच्या व रा.प. कर्मचाऱ्यांच्या समस्या, तक्रारी, सूचना ऐकून त्या तातडीने सोडविण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणार आहेत. त्यामुळे प्रवाशांचे समाधान होऊन प्रवासी सेवेचा दर्जा व गुणवत्ता वाढण्यास मदत होईल, असे एस.टी. महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांनी व्यक्त केले आहे.

राज्य परिवहन, बुलढाणा विभागातील आगारामध्ये हा दिन साजरा करण्याकरीता महामंडळाने वेळापत्रक जाहीर केले आहे. या वेळापत्रकानुसार दि. २९ ऑक्टोबर रोजी बुलढाणा आगार, १२ नोव्हेंबर रोजी चिखली आगार, १९ नोव्हेंबर रोजी खामगाव, २६ नोव्हेंबर रोजी मेहकर, ३ डिसेंबर रोजी मलकापूर, १० डिसेंबर रोजी जळगाव आणि १७ डिसेंबर रोजी शेगाव येथे प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन साजरा करण्यात येणार आहे.

या वेळापत्रकानुसार रा.प. आगारामध्ये सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत प्रवासी राजा दिन साजरा करण्यात येणार असून या वेळेत प्रवासी, प्रवासी संघटना, शाळा-महाविद्यालये आपल्या समस्या तक्रारी, सूचना लेखी स्वरुपात मांडु शकतात. तसेच दुपारी ३ ते ५ या वेळात कामगार पालक दिन साजरा करण्यात येणार असून या वेळेत संघटना व रा.प.कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक बाबतीतील प्रश्न (रजा मंजुरी, कर्तव्यासंबंधी, वेळापत्रका संबंधी व प्रमादिय कारवाई) अशा तक्रारी लेखी स्वरुपात घेऊन तक्रारीचे किंवा समस्याचे तात्काळ निराकरण करण्यात येतील. जिल्ह्यातील सर्व राज्य परिवहन बस प्रवाशी व कामगार यांनी याचा लाभ घेऊन आपल्या समस्यांचे निराकरण करुन घ्यावे, असे रा.प. महामंडळ, बुलढाणा विभागामार्फत आवाहन करण्यात येत आहे.

# मुंबापुरी उत्तर भारतीयांच्या छट पूजेसाठी सज्ज, प्रशासनाची तयारी पूर्ण

**मुंबई/प्रतिनिधी** : दिवाळीनंतर उत्तर भारतात छट पूजेच्या तयारीचे वारे वाहू लागले आहेत. उत्तर भारतीय मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात आणि मुंबईत देखील असून, बिहार विधानसभा निवडणूक आणि आगामी बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर म ुंबईतील उत्तर भारतीय रहिवाशांना आकर्षित करण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांची चढाओढ सुरू झाली आहे. छट पूजेसाठी गावी न जाऊ शकलेल्या आणि मुंबईत स्थाईक झालेल्या उत्तर भारतीयांना मुंबईत छट पूजा साजरी करता यावी यासाठी प्रशासन देखील तयारीला लागले आहे.

मुंबईत छठपूजेसाठी प्रशासनाने तयारी सुरू केली असून, उत्तर भारतीय भाविकांची पूजा सुरळीत पार पडावी यासाठी मंत्री मंगल प्रभात लोढा आणि मुंबई भाजपा अध्यक्ष अमित साटम यांनी पालिका मुख्यालयात छठपूजा आयोजनाबाबत आयुक्तांसोबत बैठक घेतली आहे. ''यावर्षीची छठपूजा मोठ्या उत्साहात आणि भक्तीने साजरी केली जाईल. भाविकांच्या सोयीसाठी, पालिका अधिकाऱ्यांना पूजास्थळांवर पिण्याचे पाणी, प्रकाशयोजना, टेबल, शौचालये आणि महिला भाविकांना कपडे बदलण्यासाठी स्वतंत्र खोलीची व्यवस्था करण्याचे निर्देश आयुक्तांना देण्यात आल्याचे मंत्री लोढा यांनी सांगितले असून, भाविकांच्या सोयीसाठी आणि सुरक्षिततेसाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. गरज पडल्यास प्रार्थनास्थळांची संख्या ६० पर्यंत वाढवता येईल अशी माहिती लोढा यांनी दिली आहे. मुंबई आणि ठाणे येथे लाखोंच्या संख्येनं उत्तर भारतीय राहतात. उत्तर भारतातील लोकांचा एक प्रमुख सण छठ पूजा मुंबईत एकूण ४० ठिकाणी साजरा केला जातो. यात जुहू, स्वराज्य भूमी गिरगाव चौपाटी, बाणगंगा तलाव यांसह अन्य महत्त्वाच्या ठिकाणचा समावेश आहे. तर, मुंबई भाजपा अध्यक्ष अमित साटम यांनी मुंबई म हानगरपालिकेने यावर्षी ६० ठिकाणी या उत्सवाची व्यवस्था करावी अशी मागणी केली आहे. छठपूजेच्या रात्री मेट्रो बससेवा सुरू ठेवावी अशीही त्यांनी मागणी केली असून, छठ पूजेच्या दिवशी संध्याकाळी पूजेपासून दुसऱ्या दिवशी सकाळ पर्यंत, मुंबई-ठाण्याच्या रस्त्यांवर आणि विविध घाटांवर सुमारे दहा लाख उत्तर भारतीय जमातील असे साटम यांनी म्हटले आहे. अमित साटम म्हणाले, ''पालिकेने प्रार्थनास्थळांच्या परवानग्यांसाठी एक खिडकी प्रणाली लागू करावी. जेणेकरून छठ पूजा आयोजक त्यांच्या संबंधित वॉर्डमध्ये अर्ज करू शकतील. पालिका लवकरच ऑनलाइन अर्ज सुविधा देखील प्रदान करेल. सुरक्षेच्या कारणास्तव, पोलिसांनी देखील पुरेशी व्यवस्था करावी आणि पूजा सर्व स्थळांवर लक्ष ठेवावे.'' यावर पालिकेचे उपायुक्त प्रशांत सकपाळे म्हणाले, ''यावर्षी छटपूजेसाठी एकूण किती उत्तर भारतीय एकत्र येतील याचा पोलिसांकडे डेटा असेल, अशी आकडेवारी पालिकेकडे नाही.''

जुहू बीचवर छठ पूजेदरम्यान मोठी गर्दी होण्याची शक्यता असून, महाराष्ट्र पोलीस कायदा आणि मोटार वाहन कायद्यातील तरतुदींनुसार, सांताक्रूझ वाहतूक विभाग २७ ऑक्टोबर रोजी दुपारी २ वाजल्यापासून २८ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत वाहतूक निर्बंध लागू करणार आहे. यासंदर्भात माहिती देताना पोलीस उपायुक्त (वाहतूक, पश्चिम उपनगरे) अजित बोऱ्हाडे यांनी सांगितलं की, सांताक्रूझ पोलीस स्टेशन जंक्शन ते ट्यूलिप स्टार हॉटेल जंक्शन मार्गे जुहू बीचकडे जाणारा मार्ग पूजा उपक्रमांमध्ये सहभागी असलेल्या वाहनांशिवाय इतर सर्व वाहनांसाठी बंद असेल. लिंक रोडवरून जुहू तारा रोडकडे जाणाऱ्या वाहनांना सांताक्रूझ पोलीस स्टेशन जंक्शनवर उजवीकडे वळावे लागेल, नंतर स्टँडर्ड चार्टर्ड बँक जंक्शनवर डावीकडे वळावे लागेल आणि स्वामी विवेकानंद रोडने पुढे जावे लागेल.

पुढे बोलताना बोऱ्हाडे यांनी सांगितलं की, काही ठिकाणी वन वे वाहतूक ठेवण्यात येणार असून, यात एबी नायर रोड चर्च रोडवरून बलराज साहनी मार्गावर एकेरी असेल. चालक जुहू चर्च रोड किंवा अल्फ्रेडो सिरोडो रोडमार्गे एनएस रोड क्रमांक १३ वापरू शकतात. ट्यूलिप स्टार हॉटेल जंक्शनहून जुहू तारा रोडकडे येणारी वाहने व्हीएम रोडने वळवली जातील.

# पोलीस स्मृती दिनानिमित्त अंबरनाथमध्ये विशेष शस्त्र प्रदर्शन : नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक आपला विदर्भ

**अंबरनाथ/प्रतिनिधी** : पोलीस स्मृती दिनानिमित्त अंबरनाथ पोलीस ठाण्याच्या वतीने नागरिकांसाठी विशेष शस्त्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश नागरिकांना पोलीस दलाच्या वापरातील विविध शस्त्रे, त्यांचे प्रकार आणि त्यांचा वापर याविषयी माहिती देणे हा होता. हे प्रदर्शन वरिष्ठ पोलीस निरीक्षक शब्बीर सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते. त्यांच्या सोबत सहाय्यक उपनिरीक्षक जितू चव्हाण यांनी नागरिकांना विविध शस्त्रांची सविस्तर माहिती दिली. या प्रदर्शनामध्ये पोलीस दलाच्या वापरातील अत्याधुनिक बंदुका, रायफल्स, पिस्तूल, गोळ्या, बॉडी प्रोटेक्शन किट, वायरलेस सेट्स आदी उपकरणांचा समावेश होता.

या उपक्रमाद्वारे नागरिकांना पोलीस दलाच्या कार्यपद्धतीची तसेच त्यांच्या शस्त्रसज्जतेची प्रत्यक्ष माहिती मिळाली. अनेक विद्यार्थी, महिला, आणि ज्येष्ठ नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन पोलीस दलाच्या कार्याबद्दल अभिमान व्यक्त केला.



प्रदर्शनात नागरिकांना माहिती देताना सहाय्यक उपनिरीक्षक जितू चव्हाण आणि अंबरनाथ पोलीस दलाचे अधिकारी.

पोलीस निरीक्षक शब्बीर सय्यद यांनी सांगितले की, ''पोलीस स्मृती दिन हा आपल्यासाठी अत्यंत भावनिक दिवस असतो. आपल्या सहकाऱ्यांनी समाजाच्या सुरक्षेसाठी दिलेल्या बलिदानाची आठवण करून देतानाच, आम्ही नागरिकांना आमच्या कार्याची जवळून ओळख करून देण्याचा प्रयत्न करत आहोत.''

या कार्यक्रमामुळे नागरिकांमध्ये पोलिसांबद्दल आदरभाव वाढला असून, पोलीस आणि नागरिक यांच्यातील समन्वय अधिक मजबूत होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

# अंधारात हरवले निरागस जीव: दोन जुळ्या चिमुकल्या जीवनाचे अमानुषिक अंत

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील अंढेरा फाटा जंगलाच्या शांततेत अचानक एक अमानुषिक घटना घडली आहे, ज्याने संपूर्ण महाराष्ट्राला धक्का दिला आहे. दोन अडीच वर्षांच्या जुळ्या बहिणींचे गळा कापून निर्दय हत्या करण्यात आल्या आहेत. या छोट्या निरागस जीवनांवर घडलेले अपार दुःख शब्दांत व्यक्त करणे अवघड आहे.

रुई (जि. वाशिम) येथील राहणारा राहुल चव्हाण, पुण्यातील एका खासगी कंपनीत काम करणारा एक वडील, हा आपल्या पत्नी व दोन मुलींसोबत घरच्या दिशेने जात होता. प्रवासादरम्यान नवरा-बायको यांच्यात वाद झाला, आणि रागाच्या भरात पत्नीने माहेरी जाण्याचा निर्णय घेतला. या क्षणी, संतापाच्या आगीने भरलेल्या मनाने राहुल आपल्या मुलींना घेऊन पुढे निघाला.

पण रागाच्या त्या अमानुषिक क्षणात खामगाव-जालना मार्गावरील अंढेरा फाटा जवळील जंगलात या दोन चिमुकल्यांचे हसरे जीवन थांबले. त्या खेळणाऱ्या हातांचा, हसणाऱ्या डोळ्यांचा आणि आई-बाबांसोबतच्या निरागस आठवणींचा संसार अचानकच संपुष्टात आला.




घटनेनंतर, २१ तारखेला, राहुल स्वतः वाशिम पोलीस ठाण्यात जाऊन हत्येची कबुली दिली. पोलिसांनी तत्काळ अंढेरा पोलीसांना संपर्क करून घटनास्थळी मृतदेह हस्तगत केले. संपूर्ण परिसरात या घटनेने खळबळ उडाली असून, स्थानिक लोक अजूनही धक्क्यात आहेत.

सध्या आरोपी राहुल अंढेरा पोलीसांच्या ताब्यात असून पुढील चौकशी सुरू आहे. ही दुःखद घटना आपल्याला आठवण करून देते की, राग आणि संताप किती प्रचंड विनाशक ठरू शकतात, आणि निरागस जीवांचे जीवन किती अल्प असते.

या दोन चिमुकल्यांच्या हसणाऱ्या आठवणी आता केवळ स्मरणांत राहिल्या आहेत. त्यांच्या निःसंवाद अंताने फक्त कुटुंबच नव्हे, तर संपूर्ण समाज हादरला आहे.

## विविध वृत्त...

### नाना पटोलेंचा महायुती सरकारवर जोरदार टीका; भ्रष्टाचारावर सवाल



दैनिक आपला विदर्भ

**भंडारा/प्रतिनिधी :** काँग्रेसचे आमदार नाना पटोले यांनी महायुती सरकारवर जोरदार टीका केली आहे. त्यांनी भ्रष्टाचारामध्ये लुप्त असल्याचा आरोप करत महाराष्ट्राच्या जनतेची लूट कशी होत आहे याची माहिती दिली.

पटोले म्हणाले की, भंडारा नगरपरिषदेत त्यांच्याच पक्षाचे खासदार नगराध्यक्ष होते. त्यानंतर प्रशासक राज असताना शिवसेनेचे आमदार उपस्थित होते. ''कोण कमिशन खातोय, कोणाला वाटा मिळत नाही, याचे कागदपत्र आम्ही जतन केले आहे,'' असे त्यांनी सांगितले.

चंद्रशेखर बावनकुळे यावर भाष्य करताना पटोले म्हणाले की, सरदार वल्लभभाई पटेल यांनी आरएसएसवर बंदी घालावी असेही म्हटले होते. ''तर मग आता हे सरदार वल्लभभाई पटेल यांना देशद्रोही जाहीर करणार आहेत का?'' असे प्रश्न त्यांनी उपस्थित केले. त्यांनी कायद्याचे पालन सर्व संघटनांनी करावे, असा संदेशही दिला.

महाविकास आघाडीबाबत बोलताना पटोले म्हणाले की, परिस्थिती पाहून निवडणुका लढवल्या जातील. युतीचा निर्णय घेण्याआधी स्थानिक कार्यकर्ते आणि नेत्यांचा विश्वास घेणे आवश्यक आहे.

### शिरपूरमध्ये मध्यरात्री धाडसी चोरी; एटीएम गॅस कटरने फोडून लाखोंची रोकड लंपास



दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** धुळे जिल्ह्यातील शिरपूर शहरात अंबिका नगर परिसरात शनिवारी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या एटीएमवर धाड टाकत लाखो रुपयांची रोकड लंपास केली आहे. ही घटना रात्री दोनच्या सुमारास घडली असून, परिसरात एकच खळबळ उडाली आहे. चोरट्यांनी गॅस कटरच्या साहाय्याने एटीएम मशीन फोडून दोन रोकड ट्रे पूर्णपणे रिकामे केले. काही रोकड मशीनजवळच विखुरलेली आढळली. प्राथमिक तपासात चोरटे स्विफ्ट डिझायर कारमधून मध्य प्रदेशकडे पळून गेल्याची माहिती मिळाली आहे. घटनेनंतर पोलिस अधीक्षक श्रीकांत देवरे, उपविभागीय अधिकारी सुनील गोसावी आणि पोलिस निरीक्षक किशोरकुमार परदेशी यांनी घटनास्थळी पाहणी केली. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासायला सुरुवात केली असून, दोन विशेष पथक मध्य प्रदेशकडे रवाना झाले आहेत. अंबिका नगर परिसरातील एटीएममध्ये सुरक्षा रक्षक नसल्यामुळे चोरट्यांना हे कृत्य करणे सोपे गेले असावे, असा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे. शिरपूर शहरातील अनेक एटीएमवर सुरक्षा रक्षक नसल्याने हे एटीएम अजूनही रामभरोसेच असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# शेगावमध्ये शिवसेना पदाधिकाऱ्यांची बैठक प्रतापराव जाधव यांचे महायुतीसाठी आवाहन




दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** आगामी नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेगाव येथे आज (२५ ऑक्टोबर) शिवसेना पदाधिकाऱ्यांची मोठ्या प्रमाणावर बैठक घेण्यात आली. केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री तसेच शिवसेनेचे नेते प्रतापराव जाधव यांनी या बैठकीत उपस्थित पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले.

केंद्रीय मंत्री जाधव यांनी कार्यकर्त्यांना आवाहन केले की केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवून महायुतीच्या माध्यमातून प्रत्येक ठिकाणी भगवा फडकविण्यासाठी पूर्ण जोमाने काम करावे. त्यांनी यावेळी नगरपालिका निवडणुकीत सक्रिय सहभाग घेण्याचे महत्त्वही सांगितले.

बैठकीत शिवसेना पक्षाचे सहसंपर्कप्रमुख शांताराम दाणे, जिल्हाप्रमुख संतोष डिवरे, उपजिल्हाप्रमुख राजेश मिरगे यांच्यासह शिवसेना महिला आघाडीच्या पदाधिकारीही उपस्थित होत्या. उपस्थित पदाधिकाऱ्यांनी केंद्रीय मंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी निवडणूक नियोजन, प्रचार धोरणे आणि कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण करण्यावर चर्चा केली.

शिवसेना पक्षाच्या या बैठकीत स्थानिक आणि उपजिल्हा पातळीवर कार्यरत पदाधिकाऱ्यांचे सक्रिय सहभाग दिसून आला. पक्षाचे वरिष्ठ नेते या बैठकीत उपस्थित राहून स्थानिक स्तरावर पक्षाची ताकद वाढवण्याचे संदेश देत होते.

प्रतापराव जाधव यांनी यावेळी कार्यकर्त्यांना एकजुटीचे महत्त्व अधोरेखित केले आणि ''शिवसेना ही जनतेच्या सेवेसाठी असून, प्रत्येक योजना लोकांपर्यंत पोहोचविणे हे आपल्या जबाबदारीत येते,'' असे सांगितले.

## सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त वॉक फॉर युनिटी चे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी शासनाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्यानिमित्त बुलढाणा जिल्हा पोलीस दल व लायन्स क्लब संस्कृती यांच्या विद्यमाने जयंतीचे औचित्य साधून वॉक फॉर युनिटीचे आयोजन करण्यात आले आहे.

खामगाव शहरातील मुख्य चौकात पोलीस दलाच्या बँड पथकाने देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण करण्यात आले. तर ३१ ऑक्टोंबर शुक्रवारी खामगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर



नगर परिषद येथून नांदूर रोड मार्गे वॉक काढण्यात येणार असून, यामध्ये विद्यार्थी व नागरिकांनी मोठ्या संख्येत सहभागी व्हावे असे आवाहन शहर पोलीस स्टेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

## अकोल्यातील राष्ट्रवादीच्या ज्येष्ठ नेत्या सुनीता भांगरे भाजपच्या वाटेवर

**अकोला/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) ज्येष्ठ नेत्या सुनीता भांगरे भाजपच्या वाटेवर आहेत. त्यांच्यासह त्यांचे पुत्र राष्ट्रवादी युवकचे जिल्हाध्यक्ष अमित भांगरे यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांची भेट घेतली. आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही भेट झाल्यामुळे राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे.

जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद अनुसूचित जमाती महिलेसाठी राखीव आहे. दोनवेळा जिल्हा परिषद सदस्य असणाऱ्या सुनीता भांगरे या पदाच्या प्रबळ दावेदार आहेत. त्यामुळे या भेटीला विशेष राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे.

विधानसभेला राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) अमित भांगरे, अपक्ष म्हणून उभे असणारे भाजपचे माजी आमदार वैभव पिचड आणि अजित पवार गटाचे डॉ. किरण लहामटे यांच्यात तिरंगी लढत झाली होती. त्यात भांगरे यांना अल्पमतानी पराभव पत्करावा लागला होता. त्या निवडणुकीत व नंतरही अमित भांगरे यांनी आमदार डॉ. लहामटे यांच्यावर शरद पवार यांची साथ सोडल्याबद्दल सडकून टीका केली होती. तसेच आपण शरद पवार यांची साथ कधीही सोडणार नाही, असे वेळोवेळी जाहीर केले होते.या पार्श्वभूमीवर ऐन निवडणुकीच्या तोंडावर अमित भांगरे यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांची भेट घेतली. विशेष म्हणजे माजी आमदार वैभव पिचड, भाजपचे ज्येष्ठ नेते सीताराम भांगरे हेही या वेळी उपस्थित होते. त्यामुळे त्यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. श्रीमती सुनीता भांगरे यांचे पती दिवंगत ज्येष्ठ नेते अशोक भांगरे यांनी यापूर्वी जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद भूषविलेले आहे.

भांगरे कुटुंब आणि विखे परिवाराचे अनेक वर्षांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. जिल्ह्यावर सध्या मंत्री विखे यांचे राजकीय वर्चस्व आहे. त्यामुळे सुनीता भांगरे यांचे नाव जिल्हा परिषद अध्यक्ष पदाच्या चर्चेत आहे. या पार्श्वभूमीवर सुनीता भांगरे यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चा सुरू आहेत. खात्रीदायक सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सुनीता भांगरे आणि माजी पंचायत समिती सदस्य दिलीप भांगरे हे भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. मात्र, अमित भांगरे भाजप प्रवेश करणार नसल्याचे समजते.

# अचानक आलेल्या पावसाने बाजार समितीत शेतकऱ्यांच्या सोयाबीनचा झाला नाश

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** दिवाळीनंतर बाजार समित्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर सोयाबीनची आवक सुरू झाली असताना, शनिवारी दुपारी अचानक बरसलेल्या पावसाने शेतकऱ्यांच्या हाती आलेला माल पुन्हा खराब झाला. अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीत अनेक शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील सोयाबीन विक्रीसाठी आणला होता. मालाची मोजणी सुरू असतानाच अचानक आलेल्या पावसामुळे बाजार समितीत गोंधळ उडाला. काही मिनिटांच्या जोरदार सरींमुळे अनेक शेतकऱ्यांचा सोयाबीन माल पावसात भिजला.

यामुळे आधीच अतिवृष्टी आणि हवामानातील अनिश्चिततेमुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना



पुन्हा एकदा मोठा फटका बसला आहे. विदर्भात गेल्या काही आठवड्यांपासून पावसाचे अनियमित आगमन सुरू असून, त्याचा फटका पिकांवर आणि आता विक्रीसाठी आणलेल्या मालावरही बसत आहे. या नुकसानीनंतर शेतकरी आणि विविध संघटनांनी अमरावती जिल्ह्याला ''ओला दुष्काळग्रस्त'' घोषित करण्याची मागणी केली आहे.

एका युवा शेतकऱ्याने सांगितले, ''आम्ही दिवाळीनंतरचा माल विक्रीसाठी बाजार समितीत आणला होता. सकाळी ऊन होते, त्यामुळे कोणीही पावसाचा अंदाज केला नव्हता. पण अचानक ढग दाटले आणि मुसळधार पाऊस आला. माल झाकण्यासाठी वेळही मिळाला नाही. काही पोत्यांमधला सोयाबीन पूर्णपणे भिजला आहे. आता हा माल व्यापाऱ्यांनी घेण्यास नकार दिला, तर आम्ही काय करू?''शेतकऱ्यांनी प्रशासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, तसेच बाजार समितीत पावसापासून मालाचे संरक्षण होईल अशी योग्य व्यवस्था करावी, अशी मागणी केली आहे.

स्थानिक कृषी अधिकाऱ्यांनी सांगितले की, ''पावसामुळे काही प्रमाणात सोयाबीन माल भिजल्याची माहिती मिळाली आहे. आम्ही स्थितीचा आढावा घेत आहोत. शेतकऱ्यांना मदत मिळावी यासाठी प्रशासनाकडे प्रस्ताव सादर केला जाईल.''अचानक आलेल्या काही मिनिटांच्या पावसाने शेतकऱ्यांचे नुकसान केले असले, तरी त्यांच्या चेहऱ्यावरील चिंता मात्र दीर्घकाळ टिकण्याची शक्यता आहे.